मराठी साप्ताहिक

RNI No. - MHMAR/25/A0785

# आजचे प्रवचनकार

सोमवार दि. : ०९/०३/२०२६ ते १५/०३/२०२६

संस्थापक संपादक : गंगाधर गुलाबराव जामनिक

● वर्ष : १ ले ● अंक : ४० ● पाने : ४ ● मूल्य : २/- || ● संपर्क - ९५०३६९५४७२ || Email - aajchepravachankar18@gmail.com

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान : टप्पा १

## महसूल सेवा आता थेट नागरिकांच्या दारी..!

सर्वसामान्य जनता आणि शेतकरी यांचे महसूल विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयांशी संबंधित दैनंदिन प्रश्न त्वरित निकाली काढणे, महाराष्ट्र जमीन महसूल संहितेतील नवीन तरतुदींची जनजागृती करून त्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे, डिजिटल सेवांचा जास्तीत जास्त वापर सुनिश्चित करणे आणि नागरिकांना 'Single Day Service Delivery' (एकाच दिवसात सेवा) पुरविणे, या उद्देशाने मार्च ते मे २०२६ या कालावधीत राज्यात महसूल मंडळ स्तर तसेच नगर परिषद व नगर पंचायत पातळीवर छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान टप्पा-१ राबविण्यात येत आहे.

**अभियानाचे वेळापत्रक –**

या अभियानांतर्गत महसूल मंडळ आणि नगर परिषद/पंचायत स्तरावर खालीलप्रमाणे एक दिवसीय शिबिरांचे आयोजन करण्यात करण्यात येणार आहे. (टीप: ज्या तालुक्यांमध्ये महसूल मंडळांची संख्या ६ पेक्षा जास्त आहे, तिथे तारखांबाबत निर्णय घेण्याचे अधिकार संबंधित जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.)

१. मंडळ स्तरावर पूर्वतयारी: १८ फेब्रुवारी ते ०५ मार्च, २०२६.

२. मार्च महिन्यातील शिबिरे: शनिवार, दि. ०७ मार्च २०२६ आणि शनिवार, दि. १४ मार्च २०२६.

३. एप्रिल महिन्यातील शिबिरे: शुक्रवार, दि. १० एप्रिल २०२६ आणि शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६.

४. मे महिन्यातील शिबिरे (नगर परिषद/पंचायत स्तर): शुक्रवार, दि. ०८ मे २०२६ आणि शुक्रवार, दि. १५ मे २०२६.




**पूर्वतयारीसाठी मार्गदर्शक सूचना –**

शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी पूर्वतयारीच्या कालावधीत खालील प्रक्रिया पूर्ण करण्याचे निर्देश शासनाकडून देण्यात आले आहेत:




जमीन वर्ग बदल: भोगवटदार वर्ग-२ जमिनींचे वर्ग-१ मध्ये रूपांतर करण्याच्या प्रकरणांची तपासणी करून, प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत आणि अद्ययावत ७/१२ लाभार्थ्यांना वितरित करावेत.

जिवंत ७/१२ मोहीम: सर्व गावांमध्ये ७/१२ वाचन पूर्ण करून प्रलंबित नोंदींच्या दुरुस्तीची कार्यवाही शिबिरापूर्वी पूर्ण करावी.

सामाजिक अर्थसहाय्य: पात्र लाभार्थ्यांचे अर्ज भरून घेऊन, समितीच्या बैठकीद्वारे लाभ मंजूर करावेत आणि शिबिरात मंजुरी आदेशांचे वाटप करावे.

तुकडेबंदी कायदा: १५ नोव्हेंबर १९६५ ते १५ ऑक्टोबर २०२४ पर्यंतच्या प्रमाणभूत सीमेपेक्षा कमी क्षेत्राच्या जमिनींच्या हस्तांतराची गावनिहाय यादी तयार करून, फेरफार नोंदी अद्ययावत कराव्यात.

विद्यार्थी दाखले: शाळांमध्ये 'कॅम्प मोड'वर विद्यार्थ्यांकडून अर्ज भरून घेऊन शिबिराच्या दिवशी दाखल्यांचे वाटप करावे.

पाणंद रस्ते व पट्टे वाटप: पाणंद रस्त्यांच्या प्रशासकीय मान्यतेचे आदेश ग्रामपंचायतींना उपलब्ध करून उर्वरित पान २ वर...

# पालघर जिल्ह्यामध्ये जागतिक महिला दिन उत्साहात साजरा

**पालघर :-** क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, पालघर व जिल्हा क्रीडा परिषद पालघर यांच्या संयुक्त विद्यमाने, दिनांक ८ मार्च जागतिक महिला दिन उत्साहात पालघर मध्ये साजरा करण्यात आला.

यावेळी आर्यन एज्युकेशन सोसायटीच्या मैदानावर महिलांसाठी क्रिकेटचे सामने, आयोजित करण्यात आले होते. तसेच महिला व विद्यार्थिनींना समाजामध्ये सक्षम स्त्री म्हणून कसे जगावे यासाठी, व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत पालघर जिल्ह्यामधील, ज्या विद्यार्थिनी खेळाडूंनी राज्य व राष्ट्रीय स्तरावर सहभाग नोंदविला आहे. यांचा यावेळी सन्मान करण्यात आला.





कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी पालघरच्या, उपजिल्हाधिकारी सीमा राऊत, या उपस्थित होत्या, तसेच आर्यन एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष उपेंद्र घरत, मुख्याध्यापिका विभूती मॅडम, जिल्हा क्रीडा अधिकारी सुहास व्हनमाने, मयूर कोल्लम, अमृत घाडगे, निलेश भोईर आदी मान्यवर उपस्थित होते.

विजयी संघाना तसेच राज्य राष्ट्रीय खेळाडूंना, सन्मानचिन्ह व ऑलम्पिक वीर खाशाबा जाधव, यांची पुस्तिका देण्यात आली.

# पालघरात 'गोवर्धन स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स इश्वाद'चे उद्घाटन उत्साहात




**मनोर प्रतिनिधी अनिल साळुंखे**

**पालघर :-** भारतीय सात्त्विक अन्नसंस्कृती, सेंद्रिय शेती आणि आध्यात्मिक मूल्यांवर आधारित पाककलेचे शास्त्रशुद्ध शिक्षण देणाऱ्या 'गोवर्धन स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स इश्वाद या नव्या शैक्षणिक केंद्राचे उद्घाटन गोवर्धन इकोव्हिलेज गालतरे येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. या उपक्रमास सिम्बायोसिस स्कूल ऑफ कुलिनरी आर्ट्स अँड न्यूट्रिशनल सायन्सेस, पुणे यांचे शैक्षणिक सहकार्य लाभले आहे. उद्घाटनानंतर पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

या प्रसंगी परम पूज्य एच.एच. राधानाथ स्वामीजी, श्री गौरांग दास प्रभुजी, उद्योजक श्री डॅनी वाधवानी तसेच सौ. इशिता दे वाधवानी हे मान्यवर प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याला विशेष आध्यात्मिक व शैक्षणिक अधोरेखा लाभली.

पत्रकार परिषदेत बोलताना मान्यवरांनी भगवद्गीतेतील 'पत्रं, पुष्पं, फलं, तोयं' या तत्त्वाचा उल्लेख करून अन्न हे केवळ उपजीविकेचे साधन नसून ते समर्पण, शुद्धता आणि कृतज्ञतेचे प्रतीक असल्याचे सांगितले. इस्कॉन परंपरेत मंदिरांमार्फत भगवानाला नैवेद्य अर्पण करून प्रसादरूपाने अन्नवितरण करण्याची हजारो वर्षांची परंपरा आहे. १९७० च्या दशकात 'गोविंदा' रेस्टॉरंट्सच्या माध्यमातून सात्त्विक भोजनाची संकल्पना व्यापक स्तरावर राबविण्यात आली असेही नमूद करण्यात आले.

नव्या संस्थेमध्ये नऊ महिन्यांचा सात्त्विक पाककला पदविका अभ्यासक्रम तसेच सहा महिन्यांचा बेकरी व पेस्ट्री कौशल्यविकास अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. सहा महिने संस्थेत प्रशिक्षण आणि तीन महिने औद्योगिक प्रशिक्षण अशी अभ्यासरचना असेल. अन्नघटकांची शुद्धता, स्वच्छता, तापमाननियंत्रण, वैज्ञानिक पद्धती तसेच कांदा-लसूणविरहित सात्त्विक पाककलेवर विशेष भर दिला जाणार आहे.

वनस्पती आधारित आहारामुळे पर्यावरणसंवर्धन, जलसंपत्तीची बचत आणि आरोग्यसंवर्धन साध्य होते. असे प्रतिपादन करत भारतीय अन्नपरंपरेचे दस्तावलीकरण करून नव्या पिढीला कौशल्याधारित रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा या संस्थेचा उद्देश असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

# देहेरे येथे ज्ञानज्योती सार्वजनिक वाचनालयाचे उद्घाटन

**पालघर :-** जव्हार तालुक्यातील देहेरे येथील समाजमंदिरात रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी सकाळी ११ वाजता ज्ञानज्योती सार्वजनिक वाचनालय व स्पर्धा परीक्षा अध्ययन केंद्राचे उद्घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. खावडा ट्रान्समिशन प्रोजेक्टच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेले हे वाचनालय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी महत्त्वपूर्ण शैक्षणिक उपक्रम ठरणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान विक्रमगड विधानसभा मतदारसंघाचे आमदार हरीशचंद्र सखाराम भोये यांनी भूषविले. त्यांच्या हस्ते वाचनालय व



अध्ययन केंद्राचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाला भाजप जिल्हा सरचिटणीस ज्योती हरीशचंद्र भोये यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी देहेरे-देवगाव ग्रामपंचायतीचे सरपंच जितेश हरीशचंद्र भोये, उपसरपंच सुमन दुर्गादास महाले तसेच ग्रामसेवक अमित अशोकराव बोर्डे उपस्थित होते.


यावेळी उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांनी वाचनाची सवय जोपासत स्पर्धा परीक्षांसाठी जिद्द आणि चिकाटीने तयारी करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आल्याचे सांगण्यात आले. या वाचनालयात विद्यार्थ्यांसाठी विविध संदर्भग्रंथ, स्पर्धा परीक्षांसाठी मार्गदर्शक पुस्तके, वर्तमानपत्रे तसेच इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे देहेरे व परिसरातील विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी एक सक्षम व्यासपीठ उपलब्ध होणार असून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीस मोठी चालना मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमास ग्रामस्थ, युवक, महिला बचत गट तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन देहेरे-देवगाव ग्रामपंचायतीतर्फे करण्यात आले.

संपादकीय
आजचे प्रवचनकार

# समानतेचे संस्कार मुलांपासूनच सुरू होऊ द्या

काळ ८ मार्च, जागतिक महिला दिन साजरा झाला. स्त्री-पुरुष समानतेसाठी घराघरांतील मुलींना नव्हे, मुलांना लिंग समानतेचा संदेश देण्याची आज खरी गरज आहे.

जागतिक महिला दिन. हा केवळ साजरा करण्याचा दिवस नाही, तर आत्मपरीक्षणाचा, नव्या संकल्पांचा आणि पुढच्या पिढीसमोर नवा आदर्श ठेवण्याचा दिवस आहे. समाज परिवर्तनाच्या वाटचालीत स्त्री-पुरुष समानतेचा विचार हा केवळ घोषवाक्य न राहता तो घराघरांत कृतीत उतरला पाहिजे. त्यासाठी पुरुषांच्या तुलनेत महिलांनी काकणभर पुढे सहभाग नोंदवला पाहिजे. त्यासाठी घरातील मुलींना नव्हे, मुलांना लिंग समानतेचा संदेश देण्याची आज खरी गरज आहे. भारतीय समाजात पितृसत्ताक विचारांचा पगडा अद्यापही दिसून येतो. मुलाने कसे वागावे, मुलीने कसे वागावे, कोणते कपडे योग्य आणि कोणते अयोग्य, असे पूर्वग्रह अजूनही आहेत. ते राहू नयेत यासाठी गरजेचे आहे शिक्षण, संवाद आणि आधुनिक दृष्टिकोन. आजच्या नवशिक्षित व अशिक्षित मातांनीही नव्या समाजनिर्मितीसाठी आपले हे दायित्व समजून घेणे म्हणजे महिला दिन साजरे करणे होय.



लहानपणापासून 'हे मुलांचे काम, हे मुलींचे काम' असे शिकवले तर मनावर लिंगभेदाचे ठसे उमटतात. आईला पाणी हातात मागणारी, आंघोळीनंतर स्वत:ची चड्डी-बनियनही धुवायला लावणारी पिढी अजूनही अस्तित्वात आहे. ही संस्कृती लिंगभेद कधीही नष्ट करणार नाही. सहशिक्षण आणि परस्पर आदराची जाणीव ही समतेची पहिली पायरी आहे. 'आपली मैत्रीण ही कुणाची तरी बहीण आहे' आणि 'आपल्या बहिणीलाही मित्र असू शकतो' ही सहज आणि सन्मानपूर्वक मान्यता देणे, ती मुलांमध्ये रुजविणे आवश्यक आहे. मुलगा आणि मुलगी यांच्यात कोणताही भेद न करता दोघांनाही समान प्रेम, समान शिस्त, समान जाणीव आणि समान संधी देणे हे आईच्या हातात आहे. मुलांना निर्णयप्रक्रियेत सहभागी करून घेणे, मुलींना स्वत:चे मत मांडण्याचे स्वातंत्र्य देणे, महिलांप्रती मुलांमध्ये आदर निर्माण करणे, या कृतीतून समतेचा पाया मजबूत होतो. मुलींसोबत कसे वागावे याचे बाळकडू प्रत्येक घरातील आईनेच देणे महत्त्वाचे आहे. घरातून लिंगभेद नाकारला, कृतिशील वस्तुपाठ अंमलात आला तर 'निर्भया' प्रकरणासारख्या घटना देशात घडणार नाहीत. या पायाभरणीची शपथ घेण्याचाही हा दिवस आहे.

संपत्ती आणि वारसा या संदर्भातही समानतेची जाणीव रुजवणे आवश्यक आहे. 'बायकांना व्यवहारात ठेवू नये', 'महिलांना व्यवहारातले काय कळते' या पूर्वापार अंधश्रद्धांना दूर करण्याचा आजचा दिवस आहे. शेतीच्या काही गुंठ्यांसाठी सही करण्यापुरती बहिणीची भूमिका मर्यादित नाही. लहानपणापासूनच मुलींना आर्थिक साक्षरता, मालमत्तेची जाणीव, स्वावलंबनाचे शिक्षण देणे ही नव्या समाजव्यवस्थेची गरज आहे. यासाठी स्वतः आईने या समान हक्काची पेरणी लहानपणीच करायला हवी. कार्यालयातील महिलांच्या पेहरावावर, त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर उपरोधिक टिप्पणी करणे थांबवले पाहिजे. असे करणे अपमान तर आहेच; पण आपल्यातील समतेच्या शिक्षणातील उणीवही दर्शवते.

भारतात अशी परिस्थिती निर्माण व्हावी की, अर्ध्या रात्री एकटा जाणारा मुलगा आणि एकटी जाणारी मुलगी या दोघांच्या सुरक्षिततेत कोणताही फरक उरू नये. ही सुरक्षितता केवळ कायद्याने नव्हे, तर संस्कारांनी निर्माण होते. मुलगा आणि मुलगी यांच्यातील अंतर कमी करून, त्यांना समानतेचे आणि सहजीवनाचे मूल्य शिकवूनच हा बदल साध्य होईल. स्वीडन, नॉर्वे, फिनलँड या देशांमध्ये पालकत्व रजेचे धोरण स्त्री-पुरुष दोघांसाठी समान आहे. त्यामुळे मुलांची जबाबदारी केवळ आईची हा समज आपोआप कमी झाला. आईसलँडने समान कामासाठी समान वेतन हा कायदा कठोरपणे अंमलात आणला. न्यूझीलंडने राजकीय नेतृत्वात महिलांचा सक्रिय सहभाग वाढवून सामाजिक दृष्टिकोनात बदल घडवून आणला. घराघरातील मुलांना लिंग समानतेचा संदेश वागण्यातून आणि संस्कारांतून देऊया. हीच खरी महिला दिनाची सार्थकता ठरेल.

# कोकण सरस २०२६ - विरार येथे महिला स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांचे भव्य विक्री व प्रदर्शन

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद), जिल्हा परिषद पालघर आणि वसई विरार महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने कोकण सरस २०२६ अंतर्गत महिला स्वयंसहायता समूहांच्या विविध उत्पादनांचे भव्य प्रदर्शन व विक्री मेळाव्याचे आयोजन म्हाडा मैदान (स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स), जकात नाका, विरार पश्चिम, ता. वसई, जिल्हा - पालघर येथे दिनांक १२ ते १६ मार्च २०२६ दरम्यान दररोज सकाळी १०.०० ते रात्री १०.०० या वेळेत करण्यात आले आहे.

ग्रामीण महिलांच्या कर्तृत्वाचा आणि कौशल्याचा उत्सव ठरणाऱ्या या मेळाव्यात स्वयंसहायता समूहांनी तयार केलेले विविध खाद्यपदार्थ, घरगुती मसाले, पारंपरिक ग्रामीण हस्तकला, कलाकुसरीच्या वस्तू, वारली पेंटिंग, कापडी पिशव्या तसेच विविध हस्तनिर्मित उत्पादने नागरिकांसाठी उपलब्ध असणार आहेत. महिलांना त्यांच्या उत्पादनांसाठी व्यापक बाजारपेठ उपलब्ध करून देणे, त्यांचे उत्पन्न वाढविणे आणि आर्थिक सक्षमीकरणाला चालना देणे हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे.

यंदाच्या मेळाव्यात खवय्यांसाठी खास मेजवानीही सज्ज असणार आहे. कोकणातील सिंधुदुर्गपासून ते मोखाड्यापर्यंतच्या ग्रामीण पारंपरिक चवींचा आस्वाद येथे घेता येणार आहे. पुरणपोळी, उकडीचे मोदक, घावणे, रस शिरवाळे, कोंबडी-वडे, नाचणीच्या भाकरी यांसह कोकणातील ताज्या समुद्री खाद्यपदार्थांची रुचकर रेलचेल नागरिकांना अनुभवता येणार आहे. पारंपरिक पाककलेचा अस्सल आणि घरगुती स्वाद या मेळाव्यातून अनुभवता येणार आहे.

कोकण विभागातील विविध जिल्ह्यांतील स्वयंसहायता समूहांचा या मेळाव्यात सहभाग राहणार असून हस्तकला, प्रक्रिया उद्योग व खाद्यपदार्थांचे एकूण १५० स्टॉल उभारण्यात येणार आहेत. नागरिकांच्या सोयीसाठी नियंत्रण कक्ष तसेच आरोग्य कक्षाचीही व्यवस्था करण्यात आली आहे. सदर उपक्रम मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रवींद्र शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालिका डॉ. रूपाली सातपुते यांच्या नियोजनातून राबविण्यात येत आहे. तसेच वसई विरार महानगरपालिकेचे महापौर अजीव पाटील, आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी (भा.प्र.से.), अतिरिक्त आयुक्त संजय हेरवाडे व दीपक सावंत यांच्या सहकार्यातून हा उपक्रम राबवण्यात येणार आहे.

कोकण स्तरावरील या सरस मेळाव्यामुळे महिला स्वयंसहायता समूहांच्या उत्पादनांना व्यापक बाजारपेठ उपलब्ध होणार असून त्यांना दीर्घकालीन ग्राहकवर्ग निर्माण करण्याची संधी मिळणार आहे.

तरी नागरिकांनी दिनांक १२ ते १६ मार्च २०२६ दरम्यान विरार येथे मोठ्या संख्येने उपस्थित राहून ग्रामीण महिलांच्या उत्पादनांची खरेदी करून तसेच कोकणच्या पारंपरिक खाद्यसंस्कृतीचा आस्वाद घेऊन या उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद द्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे तसेच आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी केले आहे.

## महिला दिन विशेष

# ग्रामीण विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी झटणाऱ्या शिक्षिका - सौ. सुवर्णा वडगणे (देशमुख)

## ग्रामीण शिक्षणासाठी अविरत प्रयत्न

**वार्ताहर – अनिल साळुंखे**

**मनोर :-** मनोर परिसरातील टाकवहाळ गावातील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या शिक्षिका सौ. सुवर्णा राजेंद्र वडगणे (देशमुख) या विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या समर्पित शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, या विश्वासातून त्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम मनापासून करत आहेत.




सन २०१९ पासून त्या मनोर-मस्ताननाका येथील टाकवहाळ जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शिकवताना त्या केवळ अभ्यासापुरते मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देतात. त्यांच्या प्रयत्नांमुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबद्दल आवड निर्माण झाली असून शाळेच्या प्रगतीला नवी दिशा मिळाली आहे.

या कार्यात त्यांना अंगणवाडी सेविका सुरेखा रावते, मुख्याध्यापिका सोनाली शेळके तसेच आशा वर्कर संध्या गणेशकर यांचे सहकार्य लाभत आहे. आपण समाजाला जे देतो तेच आपल्याकडे परत येते या विचारावर विश्वास ठेवत त्या गावातील नागरिक, शाळेतील कर्मचारी आणि विद्यार्थ्यांशी जिव्हाळ्याचे संबंध जपतात.

ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी साध्या कुटुंबातून येत असल्याने त्यांना शिक्षणासाठी लागणारे साहित्य सहज उपलब्ध होत नाही. हे लक्षात घेऊन सुवर्णा वडगणे विविध संस्था आणि समाजातील दात्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शालेय शूज, दप्तर, वह्या आणि इतर साहित्य मिळवून देण्यासाठी प्रयत्न करतात. विद्यार्थ्यांसोबतच पालकांनाही शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगण्यासाठी त्या सातत्याने मार्गदर्शन करत असतात.

त्यांच्या कार्याचे एक प्रेरणादायी उदाहरण म्हणजे टाकवहाळ गावातील स्वर्गीय बाबल्या पाडेकर यांचा मुलगा आयुष पाडेकर. सहा वर्षांचा आयुष हा थोडा गतिमंद असल्यामुळे शाळेत आल्यावर तो वारंवार रडत असे आणि आईशिवाय राहू शकत नव्हता. मात्र सुवर्णा मॅडम यांनी प्रेम, संयम आणि योग्य मार्गदर्शनाच्या माध्यमातून त्याच्यात आत्मविश्वास निर्माण केला. आज आयुष आनंदाने शाळेत येतो आणि स्वत:ची कामे स्वतः करण्याचा प्रयत्न करतो.

आपल्या मुलामध्ये झालेला हा सकारात्मक बदल पाहून आयुषच्या आईच्या डोळ्यांत आनंदाश्रू दिसतात आणि त्या संपूर्ण श्रेय सुवर्णा मॅडम यांच्या मेहनतीला देतात.

एक आई, पत्नी आणि शिक्षिका म्हणून कुटुंब व समाजाची जबाबदारी सांभाळत विद्यार्थ्यांच्या आयुष्याला योग्य दिशा देण्याचे कार्य त्या करत आहेत. ग्रामीण भागातील शिक्षणाला नवी उभारी देणाऱ्या अशा समर्पित शिक्षिकेचे कार्य खरोखरच प्रेरणादायी आहे. महिला दिनाच्या निमित्ताने त्यांच्या कार्याला मनःपूर्वक सलाम.

# छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान : टप्पा १

पान १ वरून ... द्यावेत आणि 'सर्वांसाठी घरे' योजनेअंतर्गत पट्टे वाटपाची प्रक्रिया पूर्ण करावी.

**शिबिरामध्ये उपलब्ध होणाऱ्या सेवा –** प्रलंबित फेरफार: विवादग्रस्त फेरफार नोटिसा बजावून शिबिराच्या दिवशी निकाली काढावेत.

अभिलेख दुरुस्ती हेल्प डेस्क: ७/१२ मधील चुका दुरुस्त करण्यासाठी भूमी अभिलेख विभागाचा कर्मचारी उपस्थित राहील. डिजिटल ७/१२ व ८-अ उतारे तात्काळ उपलब्ध करून दिले जातील.

लोकसेवा हक्क कायदा: उत्पन्न, रहिवासी, जात आणि नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्रांचे अर्ज स्वीकारणे व प्रमाणपत्रे वितरित करणे.

अकृषक (NA) तरतुदींबाबत मार्गदर्शन: १. कलम ४२ मधील सुधारणेनुसार, विकास आराखड्यात समाविष्ट जमिनींसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या स्वतंत्र परवानगीची गरज नसल्याबाबत नागरिकांना माहिती देणे.

२. संपुष्टात आलेल्या सनद प्रणालीबाबत (कलम ४२-अ, ब, क, ड) जनजागृती करणे.

३. एकवेळचे अधिमूल्य (One-time Premium) भरण्याच्या नवीन व्यवस्थेबाबत मार्गदर्शन करणे (दर: १ हजार चौ. मी. पर्यंत - ०.१%, ४ हजार चौ. मी. पर्यंत - ०.२५%, ४ हजार पेक्षा जास्त - ०.५%).

४. क्यूआर कोडयुक्त डिजिटल ७/१२ च्या कायदेशीर वैधतेबाबत माहिती देऊन महाभूमी पोर्टलच्या वापरासाठी प्रोत्साहन देणे.

कमी-जास्त पत्रके (KJP): भूसंपादन केलेल्या आणि अकृषिक परवानगी दिलेल्या प्रकरणांचा आढावा घेऊन गाव दप्तर अद्ययावत करावे.

एक खिडकी व्यवस्था (Single Window): सर्व महसूल अधिकारी एकाच ठिकाणी उपलब्ध राहून नागरिकांना त्वरित सेवा देतील.

**अंमलबजावणीसाठी जबाबदाऱ्या –** या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मा. मंत्री (महसूल) चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती आणि संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तारखांची प्रसिद्धी करावी, तर उपविभागीय अधिकाऱ्यांनी पर्यवेक्षणाची जबाबदारी पार पाडावी. तहसिलदारांनी सर्व विभागांच्या समन्वय बैठका घेऊन, लोकप्रतिनिधी आणि स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्याने शिबिरांचे यशस्वी आयोजन करावे, अशा सूचना शासनाकडून देण्यात आल्या आहेत.

हे अभियान अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम आणि पारदर्शक पद्धतीने राबवून, कोणत्याही नागरिकाला त्रास होणार नाही याची सर्व स्तरावरील अधिकाऱ्यांनी दक्षता घेण्याबाबतही शासनाने सूचित केले आहे.

तरी कोकण महसूल विभागात राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी अभियानाचा जास्तीत जास्त नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी आणि कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी व त्यांच्या सहकारी अधिकाऱ्यांनी केले आहे.

**– मनोज सुमन शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे / रायगड तथा प्र.उपसंचालक, विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई.**

# परुळेकर महाविद्यालयात महाविद्यालयात महिला अत्याचार प्रतिबंधाबाबत जनजागृती

## शिक्षण हेच महिलांच्या प्रगतीचे तसेच सशक्तिकरणाचे साधन आहे - प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत

आदिवासी प्रगती मंडळ संचलित कॉम्रेड गोदावरी शामराव परुळेकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तलासरी येथे महिला विकास कक्षाच्या वतीने व प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली जागतिक महिला दिनानिमित्त महिला लैंगिक अत्याचार या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमास पोलीस उपनिरीक्षक मा. योगिता गुजर तलासरी पोलीस स्टेशन या प्रमुख पाहुण्या म्हणून, तर मुख्य हवालदार मा. विना काकड या विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत हे कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात कॉ. गोदावरी शामराव परुळेकर, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व कॉम्रेड लहानू कोम यांच्या प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली.

यानंतर कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाणिज्य विभागाचे उपप्राचार्य व सहाय्यक प्राध्यापक प्रा. निलेश साळवे यांनी केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी महिलांच्या कर्तृत्वाचा थोडक्यात आढावा घेत महिलांनी विविध क्षेत्रांत साधलेल्या प्रगतीचे वर्णन केले.



यानंतर कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या पोलीस उपनिरीक्षक मा. योगिता गुजर, यांनी आदिवासी भागांमध्ये महिलांवर होणाऱ्या अत्याचार व अन्यायाच्या विविध बाबींवर प्रकाश टाकत अशा प्रकारच्या अन्याय व अत्याचारांना प्रतिबंध करण्यासाठी जागरूक राहण्याचे आवाहन केले. तसेच विद्यार्थ्यांना विविध स्पर्धा परीक्षांविषयी मार्गदर्शन करून त्या परीक्षांना सामोरे जाण्यास प्रोत्साहित केले.

तसेच त्यानंतर महाविद्यालयाचे सहा. प्राध्यापक भास्कर गोतीस यांनी देखील विद्यार्थ्यांना स्त्री शिक्षण तसेच स्त्री सशक्तीकरणाविषयी थोडक्यात मार्गदर्शन केले.

यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. बी. ए. राजपूत यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात विद्यार्थिनींनी स्वतःचे सामर्थ्य ओळखून कठोर परिश्रमांच्या जोरावर यश संपादन करावे, असे मोलाचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर शिक्षण हेच स्त्री सशक्तीकरणाचे व प्रगतीचे खरे साधन आहे ही बाब त्यांनी विद्यार्थ्यांसमोर अधोरेखित केली.

सदर कार्यक्रमास महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. होन सर, सहाय्यक प्राध्यापक प्रा. भास्कर गोतीस तसेच इतर सर्व सहाय्यक प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमाला महाविद्यालयातील २०० हून अधिक विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सहा. प्राध्यापिका दिपाली भापकर तसेच आभार प्रदर्शन डॉ. नम्रता चौधरी यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महिला विकास कक्षातील सर्व सदस्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## श्री. संत तुकाराम महाराज बीज उत्सव सोहळा वर्ष ७६ निमित्त महिला हळदी-कुंकू कार्यक्रमात अनोख्या पद्धतीने भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरीचे वाटप



**बिलोशी, दि. ३ मार्च २०२६ :–** तुकाराम गुरूजी यांच्या आशीर्वादाने, अप्पा महाराज व गणपत महाराज यांच्या प्रेरणेने तसेच यादव बाबा यांच्या कुशल मार्गदर्शनाने गेली ७६ वर्षे अखंडपणे सुरू असलेला श्री. संत तुकाराम महाराज बीज उत्सव सोहळा यंदाही मोठ्या भक्तिभावाने साजरा करण्यात आला.

या सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या महिला हळदी-कुंकू कार्यक्रमाने यंदा एक अनोखी आणि आध्यात्मिक परंपरा निर्माण केली. पारंपरिक भेटवस्तूंऐवजी महिलांना भावार्थ दीपिका अर्थात ज्ञानेश्वरी हा पवित्र ग्रंथ भेट देत कार्यक्रमाला आध्यात्मिक उंची प्राप्त करून देण्यात आली.

कार्यक्रमात मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. ज्ञानदान हेच श्रेष्ठ दान या भावनेतून आयोजक समितीने हा अभिनव उपक्रम राबविला. प्रत्येक महिलेला ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रदान करताना संत ज्ञानेश्वर माऊलींच्या विचारांचा आणि तुकोबारायांच्या अभंगांचा संदेश देण्यात आला.

हळदी-कुंकू हा केवळ सण नसून स्त्रीशक्तीचा सन्मान आहे. या माध्यमातून आध्यात्मिक संस्कारांची देणगी देण्याचा सुंदर प्रयत्न करण्यात आला. अनेक महिलांनी या उपक्रमाचे कौतुक करत, ही भेट आयुष्यभराची प्रेरणा देणारी आहे, अशी भावना व्यक्त केली.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सौ. मनिषा पंडित पाटील, सौ. सीमा संजय पाटील, सौ. वैशाली पंडित पाटील व सौ. ललिता हिरामण पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या समर्पण आणि मेहनतीमुळे कार्यक्रम अधिक भक्तिमय व संस्मरणीय ठरला.

# ग्रामपंचायत स्तरावर ८ ते २२ मार्चदरम्यान ‘जल महोत्सव’;

## पाणीपुरवठा यंत्रणा अधिक शाश्वत करण्यावर भर

**पालघर :–** ग्रामीण पाणी पुरवठा व्यवस्था अधिक शाश्वत व सक्षम करण्यासोबतच पाणी व्यवस्थापनात ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग वाढविण्याच्या उद्देशाने जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये ८ मार्च ते २२ मार्च २०२६ या कालावधीत ‘जल महोत्सव’ साजरा करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे यांनी दिली असून ग्रामस्थांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन त्यांनी केले आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत वैयक्तिक नळजोडणीद्वारे दरडोई किमान ५५ लिटर गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. याच अनुषंगाने जिल्ह्यातील शाळा, अंगणवाड्या, अनुदानित आश्रमशाळा तसेच शासकीय वसतिगृहांना देखील या योजनेअंतर्गत नळजोडण्या उपलब्ध करून देण्यात येत आहेत.

या जल महोत्सवाच्या निमित्ताने ग्रामपंचायत स्तरावर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावांमध्ये ‘लोकजल उत्सव’ साजरा करून पाणी व्यवस्थापनाबाबत जनजागृती केली जाणार असून हा उपक्रम पूर्णपणे लोकसहभागावर आधारित असेल. ग्रामसभा व पाणी समित्यांच्या माध्यमातून पाणी संवर्धन व पाणीपुरवठा व्यवस्थापनाशी संबंधित प्रत्यक्ष




कृतींवर भर दिला जाणार आहे.

याचबरोबर महिलांच्या सहभागातून फिल्ड टेस्टिंग किटच्या माध्यमातून जल गुणवत्तेची तपासणी, गावातील जलस्रोतांचे संरक्षण, पाणी बचतीचे महत्त्व आणि पाणी व्यवस्थापनातील नागरिकांची भूमिका याबाबत जागरूकता निर्माण केली जाणार आहे. गावातील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी एकत्र येऊन जलस्रोतांचे जतन व संवर्धन करण्यासाठी पुढाकार घेण्याचेही आवाहन करण्यात आले आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा व्यवस्था अधिक शाश्वत व मजबूत करण्यासाठी तसेच गावातील पाणीपुरवठा योजना सातत्याने कार्यरत राहण्यासाठी सामुदायिक सहभाग वाढविणे आवश्यक आहे. या उद्देशाने ८ ते २२ मार्चदरम्यान जिल्ह्यात ‘जल महोत्सव’ कार्यक्रम राबविण्यात येणार आहे, असे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता) अतुल पारसकर यांनी सांगितले.

दरम्यान, या कालावधीत गावांमध्ये जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, स्वच्छता मोहीम, तसेच पाणी पुरवठा योजनांचे औपचारिक हस्तांतरण करण्यात येणार आहे. ग्रामस्थांकडून सामुदायिक जलप्रतिज्ञा घेऊन पाणी संवर्धनाबाबत सामूहिक बांधिलकी व्यक्त केली जाणार असल्याची माहिती ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सचिन सुरूम यांनी दिली.

# बोईसर गोळीबार प्रकरणातील फरार आरोपी यवतमाळमधून अटकेत

## सीसीटीव्ही व तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे गुन्हे प्रकटीकरण शाखेची कारवाई

**बोईसर :–** बोईसर पोलीस ठाणे हद्दीतील वाळवे बसस्टॉप परिसरात झालेल्या गोळीबार प्रकरणातील फरार आरोपीला अखेर यवतमाळ जिल्ह्यातून अटक करण्यात आली आहे. सीसीटीव्ही चित्रीकरण, गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढत बोईसर गुन्हे प्रकटीकरण शाखेने ही कारवाई केली.

बेटेगाव येथे चिकन भुजिंगचे दुकान चालविणाऱ्या उमेश मोतीराम घरत याचे त्याच्याकडे काम करणाऱ्या महिलेशी प्रेमसंबंध होते. फिर्यादी प्रितेश सुरेश वरखंडे यांनी या संबंधास विरोध दर्शविला होता. मात्र दोघांनी विरोधाला न जुमानता मुरबे येथील मंदिरात विवाह केल्याने वाद अधिकच चिघळला.

या पार्श्वभूमीवर २३ फेब्रुवारी रोजी पहाटे सुमारे २ वाजता आरोपी उमेश घरत याने बेटेगाव-महागाव मार्गावरील वाळवे बसस्टॉप येथील घरात घुसून प्रितेश वरखंडे यांचे वडील सुरेश राजा वरखंडे यांच्या डोक्याच्या मागील बाजूस पिस्तुलातून गोळी झाडली. यात सुरेश वरखंडे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर सध्या खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. घटनेदरम्यान आरोपीने प्रितेश वरखंडे व त्यांच्या पत्नीस मारहाण करून डोळ्यात मिरची पूड टाकण्याचाही प्रयत्न केल्याचे समोर आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलीस अधीक्षक यतीश देशमुख व उपविभागीय




पोलीस अधिकारी विकास नाईक यांनी घटनास्थळी भेट देऊन आरोपीला तातडीने अटक करण्याचे आदेश दिले. पोलीस निरीक्षक सुनील जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने तपास सुरू केला.

तपासादरम्यान आरोपीने दुचाकीवरून मुंबई-अहमदाबाद महामार्गावरील आवढाणी येथील सती माता हॉटेलपर्यंत प्रवास केल्याचे उघड झाले. तेथून खाजगी बसने मुंबई गाठून मित्राच्या ट्रकमधून पुणे, सोलापूर, नांदेड मार्गे यवतमाळकडे पलायन केल्याची माहिती मिळाली. सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे संबंधित ट्रकचा माग काढत पथकाने महामार्ग पोलिसांच्या मदतीने यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील भोसा-कोसदनी परिसरातून १ मार्च रोजी आरोपीला ताब्यात घेतले.

आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहिता २०२३ मधील संबंधित कलमे तसेच अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार प्रतिबंध) कायदा आणि शस्त्र अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी विकास नाईक करीत आहेत.

या कारवाईमुळे बोईसर परिसरात कायद्याचा धाक कायम असल्याचा संदेश पुन्हा अधोरेखित झाला आहे.

गुन्हे प्रकटीकरण शाखेच्या पथकाने गोपनीय माहिती, सीसीटीव्ही चित्रीकरण आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे १ मार्च रोजी यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड जवळील महामार्गावरून ताब्यात घेत अटक करण्यात आली.

# पालघर जिल्ह्यात नाना साहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानचे भव्य स्वच्छता अभियान; अनेक टन कचरा संकलित






**पालघर, दि. १ मार्च :–** नाना साहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान तर्फे आज सकाळपासून पालघर जिल्ह्यात व्यापक स्वच्छता अभियान राबवण्यात आले. जिल्हाभरातील विविध ठिकाणी मोठ्या उत्साहात पार पडलेल्या या उपक्रमात स्वयंसेवक, स्थानिक प्रशासन आणि नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

या अभियानादरम्यान अनेक टन सुका व ओला कचरा संकलित करण्यात आला. सार्वजनिक ठिकाणे, रस्ते परिसर, बाजारपेठा आणि महत्त्वाच्या भागांची स्वच्छता करून परिसर स्वच्छ व सुंदर करण्याचा संदेश देण्यात आला. स्वच्छता हीच सेवा हा संदेश प्रत्यक्ष कृतीतून देत प्रतिष्ठानच्या कार्यकर्त्यांनी समाजापुढे आदर्श निर्माण केला.

यावेळी पालघर जिल्ह्याचे जिल्हाधिकारी, नगराध्यक्ष, नगरसेवक तसेच प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सदस्य आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी या उपक्रमाचे कौतुक करत नागरिकांनी स्वच्छतेची सवय दैनंदिन जीवनात अंगीकारावी, असे आवाहन केले.

नाना साहेब धर्माधिकारी प्रतिष्ठानच्या या उपक्रमामुळे पालघर जिल्ह्यात स्वच्छतेबाबत जनजागृती होऊन पर्यावरण संवर्धनाला मोठी चालना मिळाली असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली. पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबवण्याचा निर्धार प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

# घोलवडमध्ये राज्यातील पहिले लोक इतिहास संग्रहालय

## तारपावादक पद्मश्री भिकल्या धिंडा यांच्या हस्ते उद्घाटन : लोकसंस्कृतीचा जिवंत वारसा जपण्याचा अभिनव उपक्रम



**डहाणू :–** तलासरी तडहाणू तालुक्यातील घोलवड गावात राज्यातील पहिले लोक इतिहास संग्रहालय उभारण्यात आले असून, लोकसंस्कृतीचा समृद्ध वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा मानला जात आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ (एमटीडीसी) आणि घोलवड ग्रामपंचायतीच्या संयुक्त विद्यमाने या संग्रहालयाची उभारणी करण्यात आली आहे. नुकतेच या संग्रहालयाचे उद्घाटन सुप्रसिद्ध तारपावादक पद्मश्री भिकल्या धिंडा यांच्या हस्ते झाले.

उद्घाटनानंतर कोकण विभागाचे विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, पालघर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, डहाणूचे सहाय्यक जिल्हाधिकारी विशाल खत्री तसेच गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते यांनी संग्रहालयास भेट देऊन पाहणी केली. घोलवड हे उत्तर कोकणातील महत्त्वाचे सागरी पर्यटन स्थळ असून चिकू, लिची, जांभूळ, स्टार फ्रूट यांसारख्या बागायती पिकांसह विविध शेती उत्पादनांसाठीही घोलवड प्रसिद्ध आहे.

येथे आदिवासी, मांगेला, माच्छी, बारी, वाडवळ, मराठी, जैन, माह्यावंशी, गुजराती, पारसी आदी विविध समुदायांचे वास्तव्य असून त्यांच्या लोकसंस्कृतीचा इतिहास अत्यंत समृद्ध आहे. तारपा व घोर हे पारंपारिक नृत्यप्रकार आजही येथे जिवंत आहेत. स्वातंत्र्यलढ्यातील विविध चळवळींसाठीही घोलवडची ओळख राहिली आहे.

कृषी पर्यटनापासून ते स्पा सेवा देणाऱ्या हॉटेल्सपर्यंत विविध पर्यटनपूरक उपक्रमांची उभारणी येथे झाली आहे. नुकतेच राज्यातील तिसरे मधाचे गाव म्हणूनही घोलवडची ओळख निर्माण झाली आहे. या सर्व बाबींची दखल घेत एमटीडीसीकडून पर्यटनवाढीच्या अनुषंगाने मातीच्या रंगांचे संमेलन आयोजित करण्यात आले होते, त्याचाच एक भाग म्हणून १४५ वर्षांच्या जुन्या मराठी शाळेच्या इमारतीत राज्यातील पहिल्या लोक इतिहास संग्रहालयाची मुहूर्तमेढ रोवण्यात आली.

स्वातंत्र्यपूर्व काळातील ही शाळेची वास्तू असल्याने परिसराला ऐतिहासिक आणि भारावलेले वातावरण लाभले आहे. इमारतीच्या भिंतींवर वारली चित्रकलेचा साज चढवण्यात आला असून, स्थानिक लोकसंस्कृतीचा ठेवा जपणाऱ्या विविध वस्तू येथे मांडण्यात आल्या आहेत.

# ८ मार्च रोजी वसई-विरार महापालिकेच्या बसमध्ये महिलांना मोफत प्रवास




**वसई :–** जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून वसई–विरार शहर महानगरपालिका परिवहन सेवेत महिलांसाठी विशेष निर्णय घेण्यात आला आहे. रविवार, ८ मार्च २०२६ रोजी महापालिकेच्या बससेवेतून सर्व महिलांना मोफत प्रवासाची सुविधा देण्यात येणार असल्याची माहिती महापालिकेकडून देण्यात आली आहे.

दरवर्षी ८ मार्च रोजी जगभरात जागतिक महिला दिन साजरा केला जातो. समाज, राजकारण, अर्थव्यवस्था, विज्ञान कला आणि संस्कृती अशा विविध क्षेत्रांमध्ये महिलांनी दिलेल्या योगदानाचा सन्मान करण्यासाठी हा दिवस महत्वाचा मानला जातो. यादिवशी महिलांच्या कार्याची दाखल घेत विविध कार्यक्रम, रॅली, सांस्कृतिक कार्यक्रम तसेच गौरव सोहळ्याचे आयोजन केले जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी तसेच समानतेच्या भावनेला बळकटी देण्यासाठी हा दिवस महत्त्वाचा ठरतो.

आजच्या काळात महिला घर आणि नोकरी या दोन्ही जबाबदाऱ्या समर्थपणे पार पाडत आहेत. कुटुंबाचे पालनपोषण करण्याबरोबरच विविध क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने काम करत समाजाच्या विकासात महत्वाची भूमिका बजावत आहेत. त्यामुळे महिलांच्या या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने वसई–विरार शहर महापालिकेने विशेष उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला आहे. जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने ८ मार्च २०२६ रोजी वसई–विरार शहर महापालिकेच्या परिवहन उपक्रमाच्या सर्व बससेवांमध्ये महिलांना मोफत प्रवास देण्यात येणार आहे. महापौर अजीव पाटील, उपमहापौर मार्शल लोपीस आणि आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या पुढाकारातून हा निर्णय घेण्यात आला आहे. या दिवशी शहरातील महिला प्रवाशांना महापालिकेच्या बसमधून कोणतेही तिकीट न काढता प्रवास करता येणार आहे.

महापालिकेच्या या निर्णयामुळे कामासाठी, शिक्षणासाठी तसेच इतर कामांसाठी प्रवास करणाऱ्या महिलांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच महिला दिनाच्या निमित्ताने महिलांचा सन्मान करण्याचा आणि त्यांना प्रोत्साहन देण्याचा हा प्रयत्न असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. यामुळे वसई– विरार परिसरातील सर्व महिलांनी ८ मार्च रोजी महापालिकेच्या बस सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन परिवहन विभागाकडून करण्यात आले आहे. जागतिक महिला दिनानिमित्त घेतलेल्या या निर्णयामुळे महिलांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

प्रोप्रा . गंगाधर गुलाबराव जामनिक

प्रहर ॲड एजन्सी

संपर्क – ९५०३६९५४७२

मराठी हिंदी इंग्रजी दैनिक

आमच्या येथे सर्व प्रकारच्या मराठी, हिंदी, इंग्रजी दैनिक वृत्तपत्राच्या जाहिराती स्वीकारल्या जातील.

घोलवीरा जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, वेवूर, घोलवीरा, मनोर रोड, पालघर – ४०१ ४०४ (महाराष्ट्र)

''आजचे प्रवचनकार'' हे साप्ताहिक मराठी वृत्तपत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक गंगाधर गुलाबराव जामनिक यांनी प्रसाद प्रिंटिंग प्रेस, गाळा नंबर ५, कुसुम पार्क, सुनंदरम शाळेच्या मागे, माहीम रोड, ता. पालघर, जि. पालघर येथे छापून, २०१, वंदना निवास, जिल्हा परिषद मराठी शाळेजवळ, वेवूर, घोलवीरा, मनोर रोड, पालघर, ता. जि. पालघर, महाराष्ट्र ४०१४०४ येथे प्रकाशित केले. संपादक – गंगाधर गुलाबराव जामनिक, मोबा. ९५०३६९५४७२. RNI No. MHMAR/25/A0785 , Email - aajchepravachankar18@gmail.com सर्व वाद पालघर न्यायालय कक्षेत)
Aajche Pravachankar (Marathi Weekly) Newspaper Owner, Publisher & Printer is GANGADHAR GULABRAO JAMNIK, has published the same at House No. 201, Vandana Niwas, Near ZP Marathi School, Vevoor, Gholvira, Manor Road, Palghar, Dist. Palghar, Maharashtra 401 404 & Printed at Prasad Printing Press, Shop no. 5, kusum park, behind sundaram school, Palghar, Dist. Palghar. EDITOR - GANGADHAR GULABRAO JAMNIK (MOB. 9503695472) RNI No. MHMAR/25/A0785 , Email - aajchepravachankar18@gmail.com